# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

## विद्यापीठ रोजगार - स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र

नॅक द्वारा "अ" दर्जा प्राप्त


कार्यालय संपर्क : ०२४० २४०००५७
फॅक्स क्र. : ०२४० २४०३११३

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद. ४३१००३

विद्यापीठ संकेतस्थळ : www.bamu.ac.in
केंद्र संकेतस्थळ : www.maharojgar.gov.in

tpo@bamu.ac.in
+९१ ९८२२३२६६४६


जा. क्र. विरोवस्वरोमाका / २०१३/१४/ ८०२

दि. २५/०३/२०१४

परिपत्रक क्र. 3 रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय / कुलसचिव कार्यालय/ २०१३-१४

### परिपत्रक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की विद्यापीठ व इन्फोसिस कंपनीच्या सामंजस्य करारान्वये विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील शिक्षकांना इन्फोसिस कंपनी मध्ये जाऊन दहा दिवसीय प्रशिक्षण घेण्याची संधी मे २०१४ या महिन्यात उपलब्ध करून दिली जाणार आहे. इंग्लिश, कम्युनिकेशन स्किल्स, व्यक्तिमत्व विकास, तर्कशास्त्र, बुद्धिमत्ता विकास इ. विषय पदवीच्या विद्यार्थ्यांना शिकविणारे प्राध्यापक / शिक्षक या प्रशिक्षणासाठी पात्र आहेत.

इन्फोसिस मध्ये प्रशिक्षण घेतल्यानंतर आपल्या महाविद्यालायातील विद्यार्थ्याना हे प्रशिक्षण आपल्या मार्फत द्यावे व त्यातून विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच इन्फोसिस तर्फे घेण्यात येणाऱ्या कॅंपस मुलाखतींमधून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची निवड व्हावी व त्यांना रोजगाराची संधी प्राप्त व्हावी हा मुख्य हेतू या प्रशिक्षणाचा आहे.

इच्छुक प्राध्यापकांनी परीपात्राकासोबत जोडलेला नमुना अर्ज व हमीपत्र प्राचार्यांच्या सहीने विद्यापीठ प्लेसमेंट सेलचे अधिकारी श्री. गिरीश काळे यांचेकडे दि. ५ एप्रिल २०१४ पूर्वी सादर करावे. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर निवडक प्राध्यापकांना प्रशिक्षणाची संधी दिली जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अधिक माहिती करिता श्री. गिरीश काळे, प्लेसमेंट ऑफिसर, यांच्याशी विद्यापीठ रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, विद्यापीठ परिसर येथे संपर्क साधावा. संपर्क क्र. ०२४०-२४०००५७.

विद्यापीठ प्रांगण )(
औरंगाबाद ४३१ ००४ )(
संदर्भ: - विरोवस्वरोमाका / विभाग / २०१४ / ८०२ )(
दिनांक: - २५/०३/२०१४ )(

कुलसचिव

या परिपत्रकाची प्रत पुढील कार्यवाहीसाठी : -

1. सर्व संलग्नित महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

## विद्यापीठ रोजगार - स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र

नॅक द्वारा "अ" दर्जा प्राप्त

कार्यालय संपर्क : ०२४० २४००५७

फॅक्स क्र. : ०२४० २४०३११३

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद, ४३१००३

विद्यापीठ संकेतस्थळ : www.bamu.ac.in

केंद्र संकेतस्थळ : www.maharojgar.gov.in

tpo@bamu.ac.in

+९१ ९८२२३२६६४६

(सदर सुविधा फक्त अनुदानित महाविद्यालायांना लागू आहे)

तर्क शास्त्र / बुद्धिमत्ता (Aptitude / Logical ) या विषयावर इन्फोसिस बी.पी.ओ., बेंगलोर यांच्यामार्फत प्रशिक्षण कार्यशाळा

(प्रशिक्षण कार्यक्रमास आवश्यक माहिती)

### नामांकन पत्र

१) महाविद्यालयाचे नाव :- ____________________

२) कार्यशाळेस उपस्थित राहणाऱ्या प्राध्यापकाचे नाव व पत्ता :- ____________________

३) विषय :- भाषा कौशल्ये / तर्कशास्त्र व बुद्धिमत्ता विकास

४) विद्यापीठ मान्यता :- आहे / नाही

५) अध्यापनाचा अनुभव :- ____________________

६) मोबाईल क्रमांक :- ____________________

७) इ मेल :- ____________________

परिपत्रक क्र. विरोवस्वरोमाका / २०१३/१४/ दि. २५/०३/२०१४ मधील नमूद केलेला प्रशिक्षणाचा मूळ हेतू मी वाचला असून तो हेतू साध्य करण्याच्या उद्देशानेच मी हे प्रशिक्षण घेऊ इच्छितो.

प्राध्यापकाचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी

वरील नामांकन पत्रात नमूद केलेली माहिती पूर्णतः सत्य असून या मध्ये असत्यता आढळल्यास विद्यापीठ प्रशासनाद्वारे केली जाणारी कार्यवाही मला मान्य असेल. करिता हमी देण्यात येत आहे.

प्राचार्य

छाननी समितीचा शेरा

------------------------------------------------

------------------------------------------------